

# स्पंदन मनाचे

उषा खंदारे

# मनोगत

'स्पंदन मनाचे'हा काव्यसंग्रह आपल्या हाती देताना एक वेगळा आनंद होत आहे.

आपल्या समाजात स्त्रीला स्वातंत्र्य मिळत नाही. अनेक स्त्रियांचे दु:ख मी जवळून पाहिले. त्यांच्या वेदना ही पाहिल्या. या वेदना विविध काव्यातून प्रकट झाल्या आहेत. स्त्रीला संसाराबद्दल खूप प्रेम असते. हा संसार तिच्यासाठी स्वर्ग असतो. परंतु हा स्वर्गच तिच्यासाठी अग्नीकुंड बनतो. या कुंडात ती अहोरात्र जळत असते. पण तिची दखल मात्र घेतली जात नाही.

अजुनही स्त्रियांवरचे अत्याचार थांबलेले नाहीत. बलात्कार, ॲसिड फेकणे या तर नित्याच्याच घटना आहेत. तिचे जीवनही सुरक्षित राहिलेले नाही. काही जणी तर मृत्यूला कवटाळतात. अनन्वित छळाच्या घटनाही वर्तमानपत्रात येतच असतात. अशावेळी वाटतं, 'स्त्री म्हणून जन्माला येणं हे एक प्राक्तनचं!'

सहजपणे तिला अनेकवेळा घराबाहेर काढलं जातं माहेरचे दरवाजे बंद, पतीचे घर बंद अशा परिस्थितीत स्त्रीनं कोणतं घर आपलं मानायचं?

पुष्कळदा आपले व्यक्तिमत्व स्वत:चे साचे निर्माण करते. हे साचे यशस्वी ही ठरतात. मग आपले मन या साच्यांना घट्ट चिकटून बसते. साचेबंद होण्यात स्त्रीला सुरक्षित वाटू लागते. बंदिस्त जीवनाची तिला इतकी सवय झालेली असते की, ही मनावरची पकड प्रयत्न करूनही सैल होत नाही.

स्त्रीच्या जीवनात उन्मळून टाकणारे अनुभव येत असतात. सुख, दु:ख,

विरुपता, प्रेम, एकाकीपण अशा विविध प्रकारच्या अनुभवांना तिला सामोरं जावं लागत. अनंत दु:खांचा सतत सामना करावा लागतो. ती जीवनातील वास्तवापासून पळून जात नाही. उलट स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न करीत असते. कारण तिच्या जीवनात सोशिकतेचे गहिरे रंग असतात.

स्त्रीच्या जीवनात अगदी बालपणापासून पुरुषसुक्ताचं हुकुमी पठण तिच्या कानावर येत असतं, तिला त्याची सवय होते. पुढे-पुढे हे अंगवळणी ही पडते. हे पठण ऐकता-ऐकता सारं आयुष्य संपून जातं. परंतु जीवनात एक वेगळा क्षण येतो. हे सर्व तिला असह्य होतं. तिच्या विचारांना एक वेगळीच कलाटणी मिळते. हीच कलाटणी तिला अंतर्बाह्य बदलवून टाकते म्हणूनच तिच्यातील आत्मविश्वास जागा होतो आणि तिची वाटचाल सुरू होते, एका वेगळ्या दिशेने...

माणूस म्हणून आत्मप्रतिष्ठेने जगण्यासाठी तिच्या मनाची तडफड अखेर तिला मार्ग दाखवते. दु:खांना कवेत घेण्याची एक वेगळी शक्ती असावी लागते. निसर्गानंच ही शक्ती स्त्रीजवळ दिली आहे म्हणूनच दु:ख सहन करीत असताना ती स्वत:चा शोधही घेते. त्यामुळेच तिच्या जीवनाचे क्षितीज अधिक विस्तारत जाताना दिसते.

दीर्घकाळ पुरुषाच्या गुलामगिरीच्या बंधनांनी काचलेली, शरीरमनाची घुसमट सोसणारी आणि त्या अन्यायाविरुद्ध मुखातून शब्द न काढणारी स्त्री आता त्या संदर्भातील विचार व्यक्त करते आहे. हा बदलही खूपच महत्त्वाचा वाटतो.

काही वेळेस जीवनात निराशा येते. अपेक्षाभंगातून ही निराशा जन्माला येते. या वैफल्यातून ती बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असते. तिला झालेली स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव हेच तिच्या अपेक्षाभंगाच फलित म्हणावे लागेल.

स्वत:च्या व्यक्तिगत सुखदु:खा बरोबरच परिस्थितीचं मिळालेलं कोंदणही तितकंच महत्त्वाचं असतं. पूर्वीपेक्षा आज बदल दिसू लागला आहे. 'तिला होत असलेली अस्तित्वाची ओळख, तिचा आत्मशोध, त्याची झालेली जाणीव ही ही तितकीच महत्त्वाची आहे. अशा जाणिवा स्त्रीचं जगणं सहज करून टाकतात. म्हणूनच दु:खाचे डोंगरही एखाद्या क्षणात विरघळून जातात.

परिवर्तनाची गती ही नेहमीच मंद असते. येणाऱ्या काळात ही गती अधिक

वाढेल असा विश्वास वाटतो. स्त्रीचे यश ही पुरुषांनी आपली हार मानता कामा नये. उद्याच्या स्त्रियांनी पुरुषांची मानसिकता बदलवली पाहिजे. हे आव्हान त्या पेलतील असा विश्वास वाटतो.

घराबाहेर अधिकाराचे पद आणि घरात मात्र उपेक्षित जीवन असाही विरोधाभास स्त्रीच्या जीवनात पहायला मिळतो.

समाजव्यवस्था आणि स्त्री यांच्यामधील ताण काही काव्यांतून मी मांडला आहे. स्त्रीवादी विचारप्रणाली या कवितांचे मध्यवर्ती सूत्र आहे. जीवनजाणिवांचा विविधरुपी आविष्कार व्यक्त केला आहे.

स्त्रीच्या मनात पसरत जाणारी भावनांची वलयं असतात. तिच्या मनाच्या गाभाऱ्यात लयबद्ध अशी एक लकेर घुमत असते. तिलाही कधी कधी नि:शब्द सहवास आवडत असतो. स्त्रीच्या जीवनात अनुभूतीच्या कितीतरी नवीन वाटा, वळणं आहेत. एक जीवनोत्सुक व्यक्ती म्हणून असणाऱ्या अस्तित्वाच्या खुणांचा शोध ती घेते आहे.

जीवनातील लहानमोठ्या दु:खांनी आणि वेदनांनी, संकटांनी, अडचणींनी भेदरून न जाता आनंदाचा शोध घेत रहावा असे कविता सांगते. जुन्या सुखाच्या फसव्या कल्पनांमधून ती बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. उद्याच्या जीवनाविषयीचा आशावाद स्त्रीच्या मनात उमलताना दिसतो म्हणूनच तिचे जीवन बदलत असल्याची जाणीव त्यातून व्यक्त होते. बंधनांची झापडे तिने झुगारली असून तेच तिचे प्रयोजन आहे आणि सामर्थ्यही! भविष्यात तिची वाट अधिकच उजळलेली असेल अशी आशा व्यक्त करायला हरकत नाही.

माझ्या सहकारी शिक्षकांना व इतरांनाही कविता वाचून दाखविल्या त्या सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यातूनच प्रेरणा मिळाली आणि हा काव्यसंग्रह पूर्णत्वास गेला. डॉ.नीलिमा गुंडी यांनी अतिशय सुंदर प्रस्तावना लिहून दिली. त्यांची प्रेरणा मला नेहमीच मिळाली आहे. त्यांचे मनापासून आभार मानते.

प्रा.संतोष राणे, शारदा प्रकाशन यांनी अल्पावधित हा काव्यसंग्रह प्रकाशित केला, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ श्री.चंद्रशेखर बेगमपुरे यांनी तयार करून दिले म्हणून त्यांचेही आभार मानते.

**- उषा खंदारे**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| ★ माझिया मना | १३ | ★ ते क्षण | ४४ |
| ★ पदर | १४ | ★ मी कोण? | ४५ |
| ★ एक प्रश्न | १५ | ★ स्त्रीचं दुखणं | ४६ |
| ★ मार्ग जीवनाचा | १६ | ★ मलाही जगायचं आहे | ४७ |
| ★ निवारा | १७ | ★ निर्धार | ४८ |
| ★ प्रवास | १८ | ★ एका बेसावध क्षणी | ४९ |
| ★ बातमी | १९ | ★ देवदासी | ५० |
| ★ कोश | २० | ★ असं हे मन | ५१ |
| ★ स्मृतीचे तरंग | २१ | ★ साहस | ५२ |
| ★ मात्र | २२ | ★ मलाही अधिकार आहे | ५३ |
| ★ व्याकूळ मन | २३ | ★ सूत्रधार | ५४ |
| ★ स्मृती | २४ | ★ प्रेम सामावतं | ५५ |
| ★ नातं | २५ | ★ कैफियत | ५६ |
| ★ कवच | २६ | ★ सौदा | ५७ |
| ★ घर | २७ | ★ प्रेमाला बंधन नसतं | ५८ |
| ★ असहाय | २८ | ★ खंत | ५९ |
| ★ वेदना | २९ | ★ आस एक मनीची | ६१ |
| ★ अस्वस्थ आत्मा | ३० | ★ सलाम | ६२ |
| ★ अश्रू | ३२ | ★ मागे वळून पाहता | ६३ |
| ★ किरण | ३३ | ★ उंबरठा | ६४ |
| ★ त्याग | ३४ | ★ आसूरी आनंद | ६५ |
| ★ हिंदोळे | ३५ | ★ श्रेष्ठत्व देणारं वेगळेपण | ६६ |
| ★ तेजस्विनी | ३६ | ★ यशाची शिल्पकार | ६७ |
| ★ मंगळसूत्र | ३७ | ★ बालकामगार | ६८ |
| ★ कुंड | ३८ | ★ रिती घागर | ६९ |
| ★ मनाचं बंधन | ३९ | ★ प्रवास | ७० |
| ★ सोबतीण | ४० | ★ अडसर | ७१ |
| ★ मूक रुदन | ४१ | ★ एकतर्फी प्रेम | ७३ |
| ★ एक कळी फुलण्याआधी | ४२ | ★ समीकरण | ७४ |
| ★ अंतर | ४३ | ★ मुक्त | ७५ |



*उषा खंदारे,*
एम. ए., एम. एड., पी. एच.डी.

'स्पंदन मनाचे' या उषा खंदारे यांच्या काव्यसंग्रहात साठ कविता समाविष्ट आहेत. या कवितांमागे वैयक्तिक व सामाजिक क्षेत्रातील अनुभव आहेत. एका जागरुक, परिवर्तनशील, संवेदनशील स्त्रीमनाने टिपलेले हे अनुभव आहेत. त्यामागील स्पंदनाची थरथरही अर्थातच अनुभूतीच्या तीव्रतेनुसार कमीअधिक शब्दांतून झिरपत येते.

**डॉ. नीलिमा गुंडी**

शारदा प्रकाशन

ISBN No. : 81-89272-00-4